# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १६६२/२०२२

**अपिलार्थी, श्रीम. स्नेहा संतोष जाधव,**
मु.पो.३७४५ (२०), कृष्णरजनी अव्हेन्यू,
कुडाळ एचडीएफसी बँकेजवळ, कुडाळ,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ,
जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा
बांबर्डे तर्फे कळसुली, ता.कुडाळ,
जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ,
जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २४.०९.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०८.२०२१ | -- | २३.०९.२०२१ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ३०.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अयोग्य कारणास्तव माहिती देणे टाळले आहे."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २४.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी ॲड.उत्तम म.कदम उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सन १९४० ते दि.१५.०८.२०२१ पर्यंत जमिनीचे ७/१२ नंबर ४४/७, ४५/७, ४५/१०अ, ४५/३३, ४५/४८, ४५/५० आणि जमिनीच्या इतर दस्तवेजांची साक्षांकित माहिती मिळणेबाबत.*

1. *सोबत जोडलेल्या ८ अ मध्ये नमूद ७/१२ ची १९५६ ला ७/१२ बनल्यापासून ते आजतागायत त्यात वेळोवेळी बदल केलेल्या (अपडेट) किंवा १० वर्षांनी बदल केलेल्या ७/१२ साक्षांकित माहिती मिळणेबाबत.*
2. *वर नमूद ७/१२ च्या १९४० ते १९५६ पर्यंत शासनाकडे अधीन असलेल्या आकारबंद/गटांची /फाळणीची/ अथवा अन्य पुरावा दर्शविणाऱ्या दस्तऐवजांची साक्षांकित माहिती मिळणेबाबत."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांचे तर्फे ॲड. उत्तम म.कदम यांनी युक्तीवाद केला की, त्यांना सन १९९२ नंतरची माहिती प्राप्त झालेली आहे. त्यापूर्वीची माहिती देण्यात आलेली नाही. त्यांच्या युक्तीवादा दरम्यान त्यांनी असा दुसरा मुद्या उपस्थित केला आहे की, त्यांनी दि.१५.०८.२०२१ रोजी माहिती मागण्यासाठी अर्ज केला आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर तलाठी सजा वेताळबांबर्डे तर्फे कळसुली, ता.कुडाळ यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये सदर माहिती अर्ज हस्तांतरित केला आहे. वास्तविक माहिती अधिकाराअंतर्गत अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल, तर ती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असण्याची शक्यता असेल, अशा सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे पाच दिवसांच्या कालावधीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक आहे. परंतु याप्रकरणात या तरतूदींचे पालन झालेले नाही. आपण प्रथम अपील दाखल केल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कुडाळ यांनी सदरचा अर्ज तलाठी यांचेकडे हस्तांतर केलेला आहे.

तलाठी सजा वेताळबांबर्डे तर्फे कळसुली, ता.कुडाळ यांनी सन १९९२ नंतरची त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती आपणास दिलेली आहे. त्यापूर्वीची माहिती तहसिलदार कुडाळ यांचेकडे उपलब्ध असल्याने, ती त्यांचेकडून मिळणे आवश्यक आहे.

यासंबंधात ऑनलाईन सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जुनी माहिती असल्याने, त्यास वाळवी लागली आहे व ती नष्ट झाली आहे. त्यामुळे सदरची माहिती अपिलार्थीयांना उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र याच गावामध्ये इतर जणांचा गाव नमुना, सातबारा आपल्याकडे उपलब्ध आहे.

एकाच गावाच्या अभिलेखापैकी काही अभिलेख वाळवी लागून नष्ट झाला आहे व इतर अभिलेख सुरक्षितरित्या उपलब्ध आहे. ही बाब पटणारी नसल्याने, उपलब्ध असलेला संपूर्ण अभिलेख ज्या स्थितीमध्ये आहे त्या स्थितीत तो व्यवस्थितरित्या पॅकिंग करुन आयोगाला दाखविण्यासाठी पुढील सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तसिल कार्यालय कुडाळ यांनी घेऊन स्वत: उपस्थित राहणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कुडाळ यांनी उपलब्ध असलेला संपूर्ण अभिलेख ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तो व्यवस्थितरित्या पॅकिंग करुन घेऊन आयोगाला दाखविण्यासाठी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित रहावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.११.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**सुनावणी दिनांक १०.११.२०२५ ( In Continuation of order dt.२४.०९.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२४.०९.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कुडाळ यांनी उपलब्ध असलेला संपूर्ण अभिलेख पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.११.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी ॲड.उत्तम म.कदम उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.अमरसिंह जाधव, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय कुडाळ उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणातील अभिलेख सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने त्यांनी आजच्या सुनावणीच्या वेळी अभिलेख सादर केला आहे. सदर अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून आले की, त्यातील काही कागदपत्रे जीर्ण झाली आहेत व काही नष्ट झाली आहेत. काही कागदपत्रे सुस्थितीत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, सदर अभिलेख स्कॅनिंग करण्यात आला असून, जे कागदपत्र/सातबारा हे चांगल्या स्थितीमध्ये होते त्यांचे स्कॅनिंग झालेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेले सातबारा हे मुळातच जीर्ण झाले असल्याने/उपलब्ध नसल्याने त्याचे स्कॅनिंग झालेले नाही. त्यामुळे ते अपिलार्थी यांना देता येत नाही.

या संदर्भात प्रतिवाद करतान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड.उत्तम कदम यांनी असा युक्तीवाद केला की, अभिलेखाचे जतन करणे ही अभिलेखागार यांची जबाबदारी आहे. महाराष्ट्र जमीन महसूल नियम (खंड तीन) च्या नियम १५ अ मध्ये अशी तरतूद आहे की, *"जेव्हा एखादा अभिलेख किंवा त्याचा काही भाग गहाळ झालेला असल्याचे आढळून येईल तेव्हा अभिलेखपालाने जिल्हाधिकाऱ्याला त्याबाबत ताबडतोब कळवावे. अशा बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने विलंब न लावता चौकशी घडवून आणण्याचे निदेश द्यावेत. संपूर्ण फाईल किंवा प्रकरण गहाळ झाले असेल आणि त्याबाबतीत चोरीचा संशय असेल अशा बाबतीत चौकशी पूर्ण झाल्यावर ताबडतोब शासनाला अहवाल सादर करण्यात यावा. अशा प्रकारे कागदपत्रे वारंवार गहाळ होऊ नयेत म्हणून केलेल्या उपाययोजनांचा संपूर्ण तपशील या अहवालामध्ये देण्यात यावा."*

ॲड.उत्तम कदम यांनी महाराष्ट्र जमीन महसूल नियम (खंड तीन) च्या नियम १६ चा उल्लेख केला आहे. नियम १६ मध्ये असे नमूद आहे की, *"महसुली अभिलेख काढून टाकणे (एलिमेशन)- कोणतेही महसुल अभिलेख नष्ट करण्यापूर्वी, अवरुध्द (उम्पाजडेड) प्रकरणांच्या बाबतीत अंतिम आदेशाद्वारे ज्यांचे अधिक्रमण करण्यात आलेले नाही अशी शासनाशी संबंधित असलेली सर्व कागदपत्रे त्यांमधून वेगळी काढण्याची काळजी घ्यावी. शासनाचा अधिकार किंवा हक्क याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कागदपत्रांचा नाश करण्यात येऊ नये याची विशेष काळजी घ्यावी. असे दस्तऐवज वस्तुस्थितीच्या विवरणपत्रासह आदेशांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अग्रेषित करण्यात यावेत. जेव्हा दस्तऐवजांमध्ये खाजगी व्यक्तींशी संबंधित असलेल्या दस्तऐवजांचा समावेश असेल तेव्हा महसूल पुस्तक परिपत्रक तीनच्या परिच्छेद ११ मधील पुढील आदेशांचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा कसे हे अभिलेख्यालाने पहावे व तसे नसल्यास प्रकरण आदेशांसाठी अभिलेख कक्ष अधिकाऱ्याला सादर करावे."*

महाराष्ट्र जमीन महसूल नियम (खंड तीन) च्या नियम २१ नुसार नायब तहसिलदार हा तालुका अभिलेख कक्षाचा अधिकारी असतो, अशी तरतूद आहे. असेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

ॲड.उत्तम कदम यांच्या युक्तीवादामध्ये महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या तरतूदींचा देखील उल्लेख केला आहे. या कायद्याच्या कलम ६ नुसार अभिलेख अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत विवेचन केले आहे. त्याचप्रमाणे कलम ७ नुसार एखादा अभिलेख अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेले सार्वजनिक अभिलेख अनधिकृतपणे काढून टाकण्यात आला असेल किंवा नष्ट केला असेल तर त्याबाबतीत

योग्य त्या तरतूदी नमूद केल्या आहेत. त्याचप्रमाणे कलम ९ नुसार उल्लंघनाकरिता शिक्षा देखील नमूद केल्या आहेत. याशिवाय त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नं.६९६१/२०१२ या प्रकरणात दि.२७.०२.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाचा देखील आधार घेता आहे व निर्णयाची प्रत त्यंनी सादर केली आहे.

आपल्या युक्तीवादाच्या शेवटी त्यांनी असे नमूद केले की, फौजदारी स्वरुपाची कार्यवाही त्यंना अपेक्षित नाही. परंतु सदरचा अभिलेख पुनर्लिखित करुन आपणास देण्यात यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे. त्यांच्या संभाव्य न्यायालयीन प्रकरणामध्ये त्यांचा मालकी हक्क सिध्द करण्यासाठी असे कागदपत्र त्यांना हवे आहेत, असे त्यांनी नमूद केले आहे. सदरची जमीन ही अपिलार्थी यांना त्यांच्या वडीलांमार्फत मालकी हक्काने प्राप्त झाली आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने त्यांचेकडे काही कागदपत्र उपलब्ध असल्यास व ती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन दिल्यास जन माहिती अधिकारी यांना सहाय्यभूत ठरु शकतील. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना पुरवाव्यात. या कागदपत्रांच्या आधारे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जी कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतात ती अपिलार्थी यांना त्यापुढील ३० दिवसांच्या कालावधीत शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. व त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०८.०४.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० नोव्हेंबर, २०२५ .

**सुनावणी दिनांक ०८.०४.२०२६ ( In Continuation of order dt.१०.११.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१०.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांना माहिती पुरवून त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲड.उत्तम कदम ऑनलाई उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अमरसिंह जाधव, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कुडाळ उपस्थित आहेत. तसेच श्रीम.विद्या हरसकर, तलाठी सजा बांबर्डे तर्फे कळसुली, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांचे वकील ॲड.उत्तम कदम यांनी असा युक्तीवाद केला की, आयोगाच्या दि.१०.११.२०२५ रोजीच्या आदेशानुसार त्यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेले कागदपत्रे म्हणजे बॉम्बे रेव्हेन्यु ट्रिबनल, बेळगांव या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्यात आलेली आहे. तथापि त्यानंतर देखील जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात खुलासा करताना असे कथन केले की, अपिलार्थी यांच्या वकीलांनी दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी माहितीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तथापि त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या निवेदनाच्या आधारे आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. तहसिलदार, कुडाळ यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविणे का शक्य झाले नाही, याबाबतचे सविस्तर शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, कुडाळ,
ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

## सुनावणी दिनांक १८.०५.२०२६ ( In Continuation of order dt.०८.०४.२०२५)

### विवेचन

उपरोक्त दि.०८.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार, कुडाळ यांना शपथपत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी ॲड.उत्तम महादेव कदम ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.सचिन पाटील, तहसिलदार तसेच जन माहिती अधिकारी श्री.अमरसिंग जाधव, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कुडाळ ऑनलाईन उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तहसिलदार, कुडाळ यांनी आयोगाच्या दि.०८.०४.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचे शपथपत्र सादर केलेले नाही. त्यांनी सुनावणी दरम्यान शपथपत्र सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांचे शपथपत्र सादर करावे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. तहसिलदार, कुडाळ यांनी आयोगाच्या दि.०८.०४.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचे शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ मे, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय, कुडाळ,
ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग ४१६ ५२०.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ